## <u>अर्ज निशाणी ३५ खालील आदेश</u>

## <u>(**CNR MHSI**080010922021)</u>

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०७ यांचे कायदेशीर वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणल्याने प्रतिवादी क्र.०७ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेकरीता विनंती केली आहे. वादी यांचे कथनानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.०७ हे दि.२०/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. परंतू, वादी यांना न्यायालयीन कामकाजाचे ज्ञान नसल्याने त्यांना सदर बाबत माहिती उपलब्ध झालेली नाही. सदर वारस रेकॉर्डवर आणण्यास वादीने जाणीवपूर्वक टाळाटाळ केलेली नाही. प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र.०७ विरुध्द दावा अबेट झाला आहे. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र.०७ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.०८ ते १२अ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जात नमुद कारणे ही योग्य असल्याचे दिसून येते. सदर दावा वादीने वाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. परीणामी, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

१. निशाणी क्र.३५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.३००/– (रूपये तीनशे फक्त) विधी सेवा समिती यांचेकडे जमा करावेत.

३. प्रतिवादी क्र.०७ चे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश न्यायपुर्ततेकरीता माफ करण्यात येत आहे.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2025.08.14 10:50:06 +0530

स्थळ : कणकवली
दिनांक : १३/०८/२०२५

(शुभम जी. लटुरिया)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
वैभववाडी.